# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक ता. २० फेब्रुवारी २०१८</u>

# सिंधु नगर सोसायटी ते भाबई ले-आउट मार्ग बंद

## मनपा आयुक्तांचे आदेश : सीमेंट रस्ता बांधकामामुळे ३० एप्रिलपर्यंत वाहतूक बंद

**नागपूर, ता. २० :** शहरात सुरू असलेल्या विकास कामांतर्गत सीमेंट काँक्रीट रस्ते बांधकामादरम्यान शहरातील सिंधु नगर सोसायटी बॉम्बे स्कुटर ते भाबई ले-आउट एकता पॅलेस दरम्यानची वाहतूक बंद करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

यामध्ये सीमेंट काँक्रीट रस्ते प्रकल्प टप्पा-३ मध्ये रस्ता क्रमांक १६ सिंधु नगर सोसायटी बॉम्बे स्कुटर ते भाबई ले-आउट एकता पॅलेस दरम्यान सीमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू होत आहे. त्यामुळे या रस्त्यावरील दोन्ही बाजूची वाहतूक ३० एप्रिल २०१९ पर्यंत बंद राहील. या मार्गावरील वाहतूक दयानंद पार्कच्या बाजुच्या रस्त्यावरून वळविण्याचे आदेश आदेश महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले

आहेत. सदरबाबतचे लेखी आदेश नुकतेच निर्गमित करण्यात आले आहेत.